# महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस्

**७९ एफ रोड मरिन ड्राईव्ह, मुंबई -२०**


जा.क्र.भास्कागा/जनसंपर्क/का.०८/२०२५-२६/ ३४२ दिनांक 12 MAY 2026

प्रति,
सर्व जिल्हा संघटक,
सर्व जिल्हा संस्था,महाराष्ट्र राज्य.

**विषय:-** स्काऊट आणि गाईड चळवळीच्या प्रसार व प्रचारासाठी फॉलोअर्स संख्या वाढवून तांत्रिक (Digital) सहभाग वाढविण्याबाबत.

**संदर्भ:-** १) राज्य कार्यालयाचे पत्र क्र. २३८३, दिनांक २३/०२/२०२६
२) राज्य कार्यालयाचे पत्र क्र. २६९७, दिनांक १८/०३/२०२६
३) राज्य कार्यालयाचे पत्र क्र. २९९, दिनांक ०६/०५/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, स्काऊट आणि गाईड चळवळीचे कार्य समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि संस्थेची व्याप्ती वाढवण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करणे ही काळाची गरज आहे. या दृष्टीने राज्य स्तरावर विशेष नियोजन करण्यात आले असून, त्याबाबत सर्व जिल्ह्यांनी काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे. सर्व जिल्हा संघटकांनी राज्य कार्यालयाच्या अधिकृत सोशल मीडिया चॅनल्सचा YouTube, Facebook, Instagram इत्यादीचा जास्तीत जास्त वापर करावा. कोणत्याही जिल्ह्याने स्वतंत्र जिल्हास्तरीय सोशल मीडिया चॅनल सुरू करू नये. जिल्ह्यामध्ये आयोजित होणारे उपक्रम, सेवा प्रकल्प आणि त्यासंबंधीचे व्हिडिओ राज्य कार्यालयास पाठवावेत, जेणेकरून त्यांना राज्य कार्यालयाच्या अधिकृत प्लॅटफॉर्मवर व्यापक प्रसिद्धी दिली जाईल. राज्य कार्यालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय स्काऊट-गाईड चळवळीसंबंधी कोणत्याही प्रकारचे वैयक्तिक किंवा जिल्हास्तरीय सोशल मीडिया चॅनल सुरू केल्यास ती शिस्तभंगविषयक कार्यवाही मानली जाईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

संदर्भीय पत्र क्र. १ नुसार, संस्थेची सोशल मीडिया व्याप्ती वाढवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याने दरमहा किमान दोन उच्च दर्जाचे व्हिडिओ राज्य कार्यालयास पाठवणे अनिवार्य असल्याचे कळविण्यात आले होते. हे सर्व व्हिडिओ स्काऊट-गाईड गणवेशातच असावेत आणि त्यांची तांत्रिक अचूकता तपासूनच ते राज्य कार्यालयास सादर करावेत. व्हिडिओसोबत त्या विषयाची सविस्तर माहिती स्वतंत्रपणे मजकूर स्वरूपात (Text Format) देणे बंधनकारक आहे. उच्च दर्जाच्या व्हिडिओ निर्मितीसाठी आवश्यक असलेले तांत्रिक साहित्य उदा. कॅमेरा, वायरलेस माईक व स्टॅन्ड इत्यादी उपलब्ध करून घेण्याबाबत आपल्या जिल्ह्यातील जिल्हा मुख्य आयुक्तांशी चर्चा करून आवश्यक ती कार्यवाही करावी.

उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार सर्व जिल्ह्यांना यापूर्वीच व्हिडिओ पाठवण्याबाबत कळविण्यात आले असूनही बऱ्याच जिल्ह्यांनी अद्याप पर्यंत व्हिडिओ तयार करून पाठविलेले नाहीत. ज्या जिल्ह्यांचे व्हिडिओ अप्राप्त आहेत. त्यांनी दिनांक १८.०५.२०२६ पर्यंत राज्य कार्यालयास सदर विडिओ सादर करावेत.

संदर्भीय पत्र क्र. १ मधील सूचनेनुसार आपल्या जिल्ह्याच्या एकूण नोंदणीकृत सदस्य संख्येइतके (Census) YouTube, Facebook आणि Instagram फॉलोअर्स वाढवण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. तथापि, अद्याप कोणत्याही जिल्ह्याने हे उद्दिष्ट पूर्ण केलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सर्व जिल्हा संघटकांनी आपल्या जिल्ह्याचे हे निर्धारित उद्दिष्ट पूर्ण करण्याकरता विशेष प्रयत्न करावेत. जास्तीत जास्त स्काऊट्स, गाईड्स, रोव्हर्स, रेंजर्स, शिक्षक आणि पालकांना राज्य कार्यालयाच्या चॅनल्सची लिंक शेअर करून त्यांना चॅनल्सशी जोडण्याचे प्रयत्न करावेत. सध्या शाळांना उन्हाळी सुट्टी असल्याने, आपल्या जिल्ह्यातील अधिकृत व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून सर्व युनिट लीडर व संबंधित सदस्यांना माहिती देऊन सबस्क्राईबर्स व फॉलोअर्स वाढवण्याबाबत कार्यवाही करावी. शाळा सुरू झाल्यानंतर निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याबाबत सर्व युनिट लीडरना पुन्हा एकदा प्रोत्साहित करावे. तरी सर्व जिल्हा संघटकांनी या सूचनांचे पालन करून तात्काळ कार्यवाही करावी.

12/05/26

(सारिका बांगडकर)
राज्य सहचिटणीस

प्रत माहितीस्तव :-मा.सर्व जिल्हा मुख्य आयुक्त,सर्व जिल्हा संस्था.